तरुण भारत संवाद कोल्हापूर
गुरुवार, दि. ११ जून २०२६

# सहसंचालक कार्यालय परिसरात वृक्षलागवड

**कोल्हापूर :** 'एनएसएस' आणि 'एनसीसी' विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या परिसरात २५१ वृक्षांची लागवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते विविध ६७ प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढविसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण सोहळ्याचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते संपन्न झाले. विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी प्रास्ताविक केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. धनंजयराव गाडगीळ यांनी आभार मानले.

तरुण भारत संवाद
गुरूवार,
११ जून २०२६

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती रूजवावी

## प्रा. मिलिंद जोशी : प.पू. डॉ. बापूजी साळुंखे यांना जयंतीदिनी अभिवादन

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान खूप मोठे आहे. बापूजींचा वारसा प्रत्येक शिक्षकांनी जोपासावा, आणि विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती रूजवावी असे आवाहन प्रा. मिलिंद जोशी यांनी केले.

ताराबाई पार्क येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत मंगळवारी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीदिनी त्यांना मान्यवरांनी अभिवादन केले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात 'शिक्षण : काल, आज आणि उद्या" यावर डॉ. जोशी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. यावेळी खासदार धनंजय महाडीक यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार धनंजय महाडिक म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी प्रतिकुल परिस्थितीत शिक्षणाची गंगा गोरगरीबांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचे अतुलनीय कार्य केले. विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून



कोल्हापूर : विवेकानंद शिक्षण संस्थेत संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांना जयंतीदिनी अभिवादन कार्यक्रमात बोलताना प्रा. मिलिंद जोशी आणि खासदार धनंजय महाडीक कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे व इतर.

कौस्तुभ गावडेंना विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे, असे आवाहन केले.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी, डॉ. बापूजी साळुंखे यांनी संस्थेची स्थापना करुन शिक्षणक्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले. शिक्षकांनी बापूजींच्या विचारांचा वारसा आत्मसात करुन विद्यार्थी घडवावेत, असे आवाहन केले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी स्वागत केले. ते म्हणाले, स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणादायी विचारातून त्यांचे तत्वज्ञान आकाराला आले.

मान्यवरांनी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. विद्या समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील व डॉ. कविता तिवडे यांनी सुत्रसंचालन केले. संस्था सहसचिव (प्रशासन) एस. एम. गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्था सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ सी. बी. पाटील, संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी, उपस्थित होते.